**स्थायी निदेश क्र. १९**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र ) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदांनी अनुसरावयाची कार्यपध्द्ती.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र: नपसु २००३/प्र.क्र.८/२००३/कक्ष-६
दिनांक २९ जानेवारी २००३.

वाढत्या प्रदुषणामुळे पर्यावरणाची विशेष गरज विचारात घेवून राज्यातील नगरपरिषदांनी त्यांचे क्षेत्रात परिणामकारकरित्या महाराष्ट्र ( नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ नुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे वतीने नगरपरिषदांची वार्षिक प्रशासकीय तपासणी कामाचा मागील काही वर्षाचा आढवा घेता, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील वैधानिक तरतुदींचे परिपूर्ण पालन केले जात नसल्याचे निदर्शनास आले असून त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) वृक्ष प्राधिकरणाची स्थापना न करणे.

२) वृक्ष गणना न करणे.

३) वृक्ष कर लागू न करणे.

४) वृक्षरोपण व जगलेले वृक्ष यांची सदोष आकडेवारी प्रतिवर्षी वरिष्ठ प्राधिका-यांकडे सादर करणे.

५) वृक्ष प्राधिकरण निधीची स्थापना न करणे.

६) शहरातील वृक्षतोडीवर नियंत्रण न ठेवणे.

७) शहरातील उद्याने, सार्वजनिक जागेवरील वृक्षसंवर्धनाकडे झालेले दुर्लक्ष.

०१. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र ) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार सर्व नगरपरिषदांनी वृक्ष प्राधिकरणाची स्थापना अधिनियमाचे कलम ३ प्रमाणे एक महिन्याचे आत (स्थापना केली नसल्यास) करण्याची जबाबदारी नगपरिषदांच्या अध्यक्षांनी पार पाडावी. वरील मुद्दे विचारात घेता नगरपरिषदंचेवतीने वृक्षांचे जतनासारखे राष्ट्रीय कार्याकडे झालेले दुर्लक्ष व त्याचा पर्यावरणावर होणारा गंभीर परिणाम विचारात घेवून नगपरिषद, नगरपरिषदोचे अध्यक्ष, मुख्याधिकारी, पदाधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

०२. सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्हयातील सर्व नगरपरिषदांचे वतीने वृक्ष प्राधिकरणाची स्थापना उक्त अधिनियमाचे कलम ३ अन्वये झाली असल्याची खातरजमा वेळोवेळी करुन घ्यावी व अशा स्वरुपाची स्थापना केलेली नसल्यास नगरपरिषदांच्या अध्यक्षांनी त्यांचेवर असणारी वैधानिक जबाबदारी पार पाडण्यास कुचराई केली म्हणून तसा अहवाल शासनास तसेच संचालनालयास वेळोवेळी सादर करावा.

०३. उक्त कायद्यातील कलम ४ अन्वये वेळोवेळी अध्यक्षांनी वृक्ष प्राधिकरण्ांची सभा आयोजित करण्याची दक्षता घ्याववाची आहे.

०४. वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्य उक्त अधिनियमाचे कलम ७ अन्वये विहित करण्यात आली असून त्यातील तरतुदीनुसार सर्व नगरपरिषदांनी त्यांचे वृक्ष प्राधिकरणाची सक्षम मान्यतेने कर्तव्य पार पाडावयाची आहेत.

०५. उक्त कायद्याची परिणामकारक अंमलबजावणीसाठी कलम १८ नुसार उपकर लागू करुन तो १०० टक्के वसुलीसाठी प्रयत्न करावा.

०६. शहरातील सर्व वृक्षांची गणना करुन त्यावर नोंदणी क्रमांक टाकण्याची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी.

०७. वृक्षारोपण/जतन इत्यादी कामासाठी शहरातील समाजकार्य करणा-या संस्था,शैक्षणिक संस्था,वृक्षप्रेमी, शासकीय कार्यालय इत्यादींचे सहकार्य घ्यावे व या कार्यात सातत्य राहील या दृष्टीने त्याचे नियोजन करावे.

०८. प्रतिवर्षी नगरपरिदेच्या वतीने करण्यात येणारे वृक्षारोपणाच्या लागवडी व जतन इत्यादीचा वेळोवेळी आढावा घेता यावा या दृष्टीने खालील नमुन्यातील स्वतंत्र नोंदवही मुख्याधिकारी, संबंधित अधिकारी यांनी सुरु करावी व प्रशासकीय कामाचे वार्षिक तपासणीचे वेळी ती उपलब्ध करुन देण्यात यावी. (सोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे)

०९. मुख्याधिकारी यांनी ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर या कामाची जबाबदारी सोपविली असेल, त्यांचया कामाचा वेळोवेळी आढावा घेवून गोपनीय अहवालात त्याची नोंद घ्यावी.

१०. मुख्याधिकारी यांनी प्रतिवर्षी परिशिष्ट-अ येथील नमुन्यात त्यांच्या या कामाचा आढावा जिल्हाधिकारी यांच्याकडे त्यांचे गोपनीय अहवाल पुनर्विलोकनासाठी नगरपरिषद अध्यक्षांमार्फत सादर करावा.

नागरी क्षेत्रामध्ये वृक्षारोपणाचे असलेले महत्व विचारात घेवून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार उक्त निदेशानुसार सर्व नगरपरिषद अध्यक्ष, मुख्याधिकारी यांनी त्यांचे क्षेत्रात अभिप्रेत असलेली कार्यवाही राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जबाबदारीने पार पाडावी यात कुचराई केल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.

( रमेश म. उबाळे )
संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

नगरपरिषद :____________ जिल्हा : __________

वृक्ष लागवड संवर्धन नोंदवही सन : __________ ( १ एप्रिल ते ३१ मार्च )

| अ.क्र | वृक्ष लागवड उद्दिष्ट | वृक्ष लागवडीसाठी रोपे उपलब्ध करुन घेण्याचे स्त्रोत | | वृक्ष उपकर मागणी | | | रोपे लागवड खरेदीसाठी झालेला खर्च | | | वृक्ष संवर्धना वरील इतर खर्च (आस्थापना वगळून ) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वत:ची रोपवाटीका | विकत घेणे | मागील | चालू | एकूण | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | खर्च प्रयोजन | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

| रोपांच्या लागवडीचा वृक्षनिहाय तपशील | | | | | वृक्ष संवर्धन आस्थापना खर्च | | वृक्ष गणना नुसार शहरातील एकूण वृक्ष | वृक्ष तोडी साठी देण्यात आलेल्या परवानगी | अनधिकृत वृक्ष तोडीची प्रकरणे | अनधिकृत वृक्ष तोडी संदर्भात करण्यात आलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीचे स्तर | कोणत्या प्रकारच्या रोपाची लागवड केली | किती रोपांची लागवड केली | लागवडीचा दिनांक | वर्ष अखेरीस लागवडी खाली जगलेली रोपे | स्थायी आस्थापना | रोंजदारी | | | | | |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| | | | | | | | | | | | |

संबंधित अधिकारी मुख्याधिकारी